| CNR No.MHWR040010522024 | दाखल तारिख | १६/०७/२०२४ |
|---|---|---|
| | नोंदणी तारिख | १६/०७/२०२४ |
| | निकाल तारिख | १८/०७/२०२६ |
| | कालावधी | ०२ वर्षे, ०० म, ०२ दि. |

# न्यायनिर्णय

(घोषीत दिनांकः १८/०७/२०२६)

आरोपीविरुध्द महाराष्ट्र दारुबंदी कायदा कलम ६५(एफ) अन्वये अपराधाच्या आरोपासाठी सदरचा खटला करण्यात आला आहे.

२. अभियोगपक्षातर्फे सहाय्यक सरकारी अभियोक्ता यांचा तसेच आरोपीतर्फे विद्वान वकीलांचा युक्तिवाद ऐकण्यात आला. प्रकरणाच्या न्यायनिर्णयाकरिता माझ्या समक्ष खालील मुद्दे उपस्थित झाले असून त्यांचे निष्कर्ष कारणमिमांसेसह खालीलप्रमाणे आहे.

| अ.क्र. | मुद्दे | निष्कर्ष |
|---|---|---|
| १. | अभियोगपक्षाने हे सिद्ध केले आहे काय की, दि.२६/०८/२०२३ रोजी वेळ २१.१५ ते २१.४५ वाजताच्या दरम्यान पारधी बेडा, मौजा केळझर, ता. सेलू, जिल्हा–वर्धा येथे आरोपीच्या ताब्यातून अवैधरित्या व विना परवाना दोन प्लास्टीक ड्रममध्ये अंदाजे ४०० लिटर कच्चा मोहा सडवा व दोन प्लास्टीक ड्रम जवळ बाळगतांना मिळून आला, म्हणून आरोपीने महाराष्ट्र दारूबंदी कायद्याच्या कलम ६५(एफ) अंतर्गत गुन्हा केला आहे ? | नकारार्थी |
| २. | आदेश काय ? | आरोपीला निर्दोष मुक्त केले. |

## :: कारणमीमांसा ::

३. अभियोग पक्षाने आरोपीवरील गुन्हा सिध्द करण्यासाठी पंच साक्षीदार शरद भिवाजी चव्हाण यांची साक्ष निशाणी क्र.०६ पुढे नोंदविली. पुरेशी संधी देवुनही इतर साक्षीदारांना उपस्थित ठेवण्यात अभियोगपक्षाला यश आले नाही. त्यामुळे निशाणी क्र.१ वर आदेश पारीत करून अभियोगपक्षाचा पुरावा बंद करण्यात आला. खटला चालवित असतांना आरोपीविरूध्द गुन्ह्या संदर्भात कोणतीही विधाने आलेली नसल्यामुळे भारतीय नागरिक सुरक्षा संहिताचे कलम ३५१ प्रमाणे आरोपीची जबानी नोंदविण्यात आली नाही.

**मुद्दा क्र. १ करीता :**

४. अभियोगपक्षाने आरोपीविरूध्द महाराष्ट्र दारुबंदी कायदा कलम ६५(एफ) प्रमाणे आरोप सिध्द करण्यासाठी, आरोपी हा स्वत:च्या फायदयासाठी अथवा विक्रीसाठी त्याच्या ताब्यात अवैधरित्या व विना परवाना कच्चा मोहा रसायन सडवा व इतर भट्टी साहित्य जवळ बाळगतांना मिळून आला, ही बाब सिध्द करणे आवश्यक आहे.

५. त्या अनुषंगाने अभियोगपक्षाने पंच साक्षीदार शरद भिवाजी चव्हाण यांची साक्ष निशाणी क्र.०६ पुढे तपासले. त्यांनी त्यांच्या साक्षीमध्ये कथन केले की, दि.२७/०८/२०२३ रोजी पोलीसांनी त्यांना जप्ती पंचनामा करण्याकरिता बोलविले नव्हते. पोलीसांनी त्यांची एका कागदावर सही घेतली होती परंतु त्यातील मजकूर त्यांना माहित नसल्याचे सांगितले. त्यांना सदरचा पंचनामा दाखविण्यात आला. त्यांनी पंचनाम्यावरील त्यांची सही ओळखली, परंतू त्यातील मजकुर माहित नसल्याचे सांगितले. म्हणून विद्वान सरकारी वकिलांनी त्यांना परवानगीनंतर उत्तर सूचक प्रश्न विचारले असता त्यांनी नाकारले की, दि.२७/०८/२०२३ रोजी पोलीसांनी त्यांना मौजा केळझर, पारधी बेडा, येथे पंचनामा करण्यासाठी बोलविले होते व त्यांच्या समक्ष पंचनामा केला व प्लास्टीक डबकीमध्ये ४०० लिटर कच्चा मोहा सडवा व दोन प्लास्टीक

ड्रम जप्त केले. तसेच त्यांच्या समक्ष सदरील कच्चा मोहा मधुन १८० एम.एल. वेगळा काढुन रासायनिक परिक्षणासाठी सील करुन पाठविण्यात आला.

६. सदर प्रकरणात रासायनिक विश्लेषणाचा अहवाल सादर करण्यात आला नाही. तसेच नमुन्यासाठी जप्त मुद्देमालापैकी वेगळा काढण्यात आला होता, इत्यादी बाबी सांगणा–या कोणत्याही साक्षीदाराची साक्ष नोंदविण्यात आलेली नाही. सी.ए. सॅम्पल काढून नागपूर येथील न्यायवैदयक प्रयोगशाळा येथे सिल करून सुरक्षितपणे पोहचविले याबाबतचा कुठलाही पुरावा अभिलेखावर अभियोग पक्षाने आणलेला नाही. सबब, जप्त करण्यात आलेला मुद्देमाल हा घटनास्थळावरून जप्त करण्यात आला, ही बाब पुराव्या अभावी सिध्द होवू शकली नाही.

७. प्रस्तूत प्रकरणात अभियोग पक्षाने फिर्यादी व तपासी अंमलदार तपासले नाही. अभियोग पक्षाने मौकाजप्ती पंचनामा सिध्द करण्याकरीता मौकाजप्ती पंच साक्षीदार तपासले परंतु त्यांनी मौकाजप्ती पंचनामा बाबत काही सांगितले नाही. त्यामुळे मौकाजप्ती पंचनामा सिध्द झालेला नाही. अशा परिस्थितीत आरोपीच्या ताब्यातून अवैधरित्या व विना परवाना दोन प्लास्टीक ड्रममध्ये अंदाजे ४०० लिटर कच्चा मोहा सडवा व दोन प्लास्टीक ड्रम जवळ बाळगतांना मिळून आला, ही बाब सिध्द झाली नाही.

८. त्यामुळे संचीकेवरील एकंदरीत पुराव्याचे अवलोकन करता अभियोग पक्षाने आरोपीविरूध्दचा महाराष्ट्र दारुबंदी कायदा कलम ६५(एफ) चा गुन्हा आरोपीने केल्याचे सिध्द केलेले नाही या निष्कर्षावर मी पोहोचले आहे. करीता मी मुद्दा क्र.१ चे उत्तर नकारार्थी देत आहे.

**<u>मुद्दा क्र. २ करीता</u> :**

९. अपराध क्रमांक ६०५/२०२३ मधील जप्त मुद्देमाल जागीच पंचासमक्ष नाश केल्यामुळे त्याबाबत कोणताही आदेश पारीत करण्यात येत नाही. वरील मुद्यांचा

नकारार्थी निष्कर्ष पाहता आरोपी हा ठेवलेल्या आरोपामधुन निर्दोष मुक्त होण्यास पात्र आहे. वरील सर्व कारणांचा विचार करता, मी खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

## आदेश

१) आरोपी **सुनिल प्यारेलाल भोसले** याची महाराष्ट्र दारूबंदी कायदा कलम ६५(एफ) अन्वयेच्या गुन्ह्यातून भारतीय नागरीक सुरक्षा संहिताचे कलम २७८(१) [फौजदारी प्रक्रिया संहिताचे कलम २५५(१)] अन्वये निर्दोषमुक्त करण्यात येत आहे.

२) आरोपीचे वैयक्तीक बंधपत्र रद्द करण्यात येते.

३) अपराध क्रमांक ६०५/२०२३ मध्ये भरलेली सुरक्षा राशी रक्कम जर असेल तर आरोपीला अपिल कालावधी संपल्यानंतर परत करण्यात यावी.

४) आरोपीने भारतीय नागरीक सुरक्षा संहिताचे कलम ४८१ [फौजदारी प्रक्रिया संहिताचे कलम ४३७–अ] प्रमाणे रु.१५,०००/– किंमतीचा वैयक्तीक जात मुचलका सादर करावा.

(न्यायनिर्णय खुल्या न्यायालयात जाहीर करण्यात आला.)

SHAILESH RAJENDRA SATBHAI
Digitally signed by SHAILESH RAJENDRA SATBHAI
Date: 2026.07.18 16:58:33 +0530

**(एस.आर.सातभाई)**

**दिनांक** : १८/०७/२०२६

न्यायदंडाधिकारी प्रथम श्रेणी,
सेलू, जिल्हा–वर्धा

**CERTIFICATE**

I affirm that the contents of this P.D.F. file is same, word to word as per the original.

(R. M. Khan)
Stenographer (Grade-III)